महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक सीडीआर-११८२/८५/१/११,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जून १९८२.

परिपत्रक

सर्व मंत्रालयीन विभागांचे लक्ष क्रमांक सीडीआर-११७५/९९०/अकरा, दिनांक २३ जानेवारी १९७८ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे.

२. रिट अर्जात किंवा न्यायालयापुढे असलेल्या प्रकरणात न्यायालयाचा निर्णय शासनाविरुद्ध लागला असता, न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील दाखल करण्यासंबंधी निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यपद्धती अवलंबिली पाहिजे यासंबंधी सूचना वरील परिपत्रकामध्ये देण्यात आल्या आहेत. न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील दाखल करण्यापूर्वी विभाग प्रमुखांनी शासनाचे आदेश घेणे आवश्यक आहे व अशा प्रकरणात निर्णय घेण्यासाठी मंत्रालयीन विभागांनी त्याबाबत संबंधित मंत्रीमहोदयांचे आदेश घ्यावेत.

३. पाटबंधारे विभागाच्या क्रमांक एसयूटी-१०८१/५२९/(५८)/ई-१४, दिनांक ३ मार्च १९८१ च्या परिपत्रकाद्वारे शासनाने असे आदेश दिले आहेत की, कामगारांनी कामगार न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचा निर्णय शासनाविरुद्ध लागला असता, कामगार न्यायालयाचा निर्णय कामगारविषयक कायद्यांच्या तरतुदींशी विसंगत असल्याशिवाय कामगार न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील करण्यात येऊ नये. विशिष्ट विभागांतील किंवा कामावरील शासकीय कर्मचाऱ्यांना कामगार कायदे लागू आहेत की नाही हा तत्वाचा प्रश्न उद्भवला असेल किंवा न्यायालयाचा निर्णय कामगारविषयक कायद्याच्या तरतुदीशी विसंगत असेल तर उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग व विधी व न्याय विभाग यांचा सल्ला घेण्यात यावा आणि अपील करण्याबाबत संबंधित मंत्रालयीन विभागाने मंत्रीमहोदयांचे आदेश घ्यावेत.

४. सर्व मंत्रालयीन विभाग व सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व विभाग प्रमुखांना व कार्यालय प्रमुखांना असे कळविण्यात येत आहे की, वरील सूचना त्यांनी काळजीपूर्वक अंमलात आणाव्यात. ज्या प्रकरणांत न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील करणे आवश्यक आहे, तेथे वरील परिच्छेद २ अगर ३ प्रमाणे सर्व उपचार ( Formalities ) कमीत कमी वेळांत पूर्ण करुन अपील दाखल करण्यासंबंधी निर्णय घेण्यात यावा व अपील योग्य मुदतीत दाखल होईल यासंबंधी दक्षता घ्यावी.

५. वरील परिच्छेद १ व ३ मध्ये उल्लेख केलेल्या परिपत्रकांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. भा. उंडे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

...पाल यांचे सचिव,
...मंत्र्यांचे सचिव,

...८०(४०००-६-८२)१.

सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,

सर्व राज्यमंत्र्यांचे व उपमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,

*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

सर्व मंत्रालयीन विभाग,

मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.

---

*पत्राने.

एच-३८०(४०००-६-८२)१ज.